परिवहन समितीच्या शनिवार दि. 16/12/2017 रोजी दुपारी 02:00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सदस्य

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 4 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 5 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 6 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 7 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 8 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 2 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 3 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 4 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 5 | **श्री. संदीप चंद्रभान जाधव<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. शिवाजी जगताप** | परिवहन व्यवस्थापक |
| 2 | **श्री. हरिश दुबे** | निगम सचिव |

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 32</u> :– फक्त महिलांसाठी रेड मिनी बस सेवा चालविण्याकरिता महाराष्ट्र शासनाद्वारे निधी रु 9.25 कोटी मंजूर झाला असुन या योजनेअंतर्गत स्टॅडर्ड, मिडी, मिनी यापैकी कोणते प्रकारचे वाहन घ्यावे, तसेच या बसेसची रंग–संगती कोणत्या प्रकारची असावी याबाबत निर्णय घेण्याकरिता परिवहन समितीद्वारे मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून मिडी बसेस (क्षमता 32 आसनपावेतो) घेण्यास व रंगसंगती शासनाच्या निर्धारित धोरणाप्रमाणे ठरविण्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

सभापतीः—एक विचारात्मक विषय आहे. महानगरपालिकेने स्वच्छता ॲप चा विषय घेतला आहे. या विषयाच्या अनुषंगाने समिती एक निर्णय घेते की परिवहन व्यवस्थेतील सर्व ड्रायव्हर, कन्डक्टर, समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छता ॲप डाऊनलोड करून घ्यावा. तसेच बसचे ड्रायव्हर, कन्डक्टर जे वाहतुक सिग्नलवर आणि बसस्टॉपवर पान, खर्रा खाऊन थुंकतात ज्यामुळे बसेसची स्थिती अत्यंत खराब होवून जाते. याकरिता समितीमार्फत निर्देश देण्यात येतात की ड्रायव्हर आणि कन्डक्टर यांनी स्वच्छतेच्या संदर्भात काटेकोरपणे पालन करावे. अशाप्रकारे त्यांनी कुठेही थुंकू नये. असे करतांना जर ते आढळले तर त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी. त्यांना वेळप्रसंगी निलंबित सुध्दा करण्यात यावे. तसेच ड्रायव्हर आणि कन्डक्टर यांनी आपली बस स्वच्छ ठेवल्यास त्याकरिता त्यांना स्वच्छता दूत म्हणून पुरस्कृत करण्यात यावे.

श्री.नितीन साठवणेः— मा.सभापती महोदय, यापूर्वी 29.06.2017 च्या समितीच्या बैठकीमध्ये कबाड झालेल्या बसेस काढून डेपोची जागा मोकळी करून देण्याकरिता निर्णय झाला होता. याकरिता मा.सदस्यांची एक समिती बनवून हा विषय निकाली लावण्यात यावा त्या विषयावर काय झाले? समिती कां गठीत करण्यात आली नाही याविषयी सांगण्यात यावे.

श्री.प्रविण भिसीकरः— मा.सभापती महोदय, सभेमध्ये मा.सभापती जे निर्देश देतात. त्या आदेशाचे पालन होते काय? प्रशासनाची काय जबाबदारी होती त्या सभेमध्ये भंगार काढण्यासाठी एक उप समिती गठीत करण्याचे निर्देश दिले होते त्यावर कार्यवाही करून कार्यान्वित कां करण्यात आले नाही. दुस—या एका परिवहन समितीमध्ये आदेश दिले होते. सगळया समितीमध्ये परिवहन समिती ही मेन समिती आहे. या समितीकरिता सभा भत्ता राहतो काय? हे विचारण्यात आले होते. याच्याकरिता तुमच्या मार्फत समितीमध्ये विषय यायला पाहिजे होता. हा विषय कां आला नाही. जबाबदारी ही कुणाची होती. जर तुम्ही तुमच्या जबाबदारी पासून हटत असाल तर त्याच्यावर कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

व्यवस्थापक(श्री.जगताप):—मा.अध्यक्ष महोदय, भंगार विषयाची पहिली प्रक्रिया पुर्ण केलेली आहे. विभागप्रमुख म्हणून याबाबतचा मला अधिकार नाही. मी यासाठी गाडयांचे डिटेल्स् काढले आहे ते सादर केल्यानंतर कुठल्या मार्गाने जाता येईल ते बघावे लागेल. गाडया स्क्रॅप करण्याची प्रोसेस क्लिष्ट आहे. कागदोपत्री कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर ट्रान्सपोर्ट कमेटीकडे अप्रुव्हल करण्याकरिता पाठवावे लागते. आपल्या बरेच गाडयांवर दंडात्मक कार्यवाही झालेली आहे ते आधी क्लिअर करावे लागेल. जुनी थकबाकी भरल्याशिवाय आरटीओकडून एनओसी मिळणार नाही. ही क्लिष्ट प्रोसेस असल्यामुळे याला दिरंगाई होत आहे.

श्री.प्रवीण भिसीकरः— मा.अध्यक्ष महोदय, ज्या विषयामध्ये समिती गठीत करावयाची आहे त्याबाबतचे क्लेरीफिकेशन जगताप साहेब आता देत आहे, ते किती मा.सदस्यांना माहीत आहे. जी काही कार्यवाही करणार आहे ती प्रत्येक मा.सदस्यांना फारवर्ड करण्यात यावी. मा.

सभापती यांनी आताच डिक्लेरेशन दयावे की हे तीन मा.सदस्य कमेटीमध्ये राहतील. उपसमिती गठीत करण्यात यावी आणि मा.सदस्यांचे नाव डिक्लेअर करण्यात यावे.

<u>ठराव कमांक 33</u> :— वरील चर्चेनंतर मा.सदस्यांचा मानस लक्षात घेता समितीतील तीन सदस्यांची समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येते. मा.सभापती यांनी सुचित केल्याप्रमाणे समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

| | |
|---|---|
| 1.श्री.प्रविण भिसीकर | अध्यक्ष |
| 2.श्रीमती अर्चना पाठक | सदस्य |
| 3.श्री.नितीन साठवणे | सदस्य |

श्री.नितीन साठवणेः—मा.अध्यक्ष महोदय, दुसरा एक विषय होता, मागे परिवहन समितीतील सदस्यांच्या सभेच्या भत्याबाबत बोललो होतो.

व्यवस्थापक(श्री.जगताप):—मा.अध्यक्ष महोदय, सभेच्या भत्याची तरतूद नसल्याचे निदर्शनास आले आहे.

निगम सचिवः— मा.अध्यक्ष महोदय, असा मानधनाच्या विषयाबाबत कोणतीही तरतूद नाही.

श्री.पागेः—मा.अध्यक्ष महोदय, कलम 28 मध्ये तरतूद आहे. समिती सदस्यांना सभेत उपस्थित राहण्यासाठी नियमाप्रमाणे विहीत करण्यात येईल असा वाहन खर्च देण्यात येईल.

श्री.नितीन साठवणेः—मा.अध्यक्ष महोदय, ज्या कंपनींना कॉन्ट्रक्ट बेसीसवर लावले आहे तेथील वर्करला मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे वेजेस देण्याचे ठरले आहे त्याप्रमाणे ते देण्यात येतात काय?

व्यवस्थापक(श्री.जगताप):—मा.अध्यक्ष महोदय, आपल्याकडे कार्यरत कंपनी आहेत. यांना मिनीमम वेजेस ॲक्ट 1948 प्रमाणे बंधनकारक आहे. औद्योगिक उर्जा कामगार मंडळाची 2010 ची अधिसूचना आहे. या मिनिमम वेजेस कसा असावा याबाबत शासन निर्णय आहे. त्यानुसार या सर्व कर्मचा—यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

श्री.नितीन साठवणेः—मा.अध्यक्ष महोदय, परिवहन विभाग तोटयात चालून राहिला. हिंगणा बस डेपो मधून बस निघते तर ऑपरेटर दर कि.मी. प्रमाणे रेट घेतो. याकरिता वेगवेगळया क्षेत्रात डेपो घेण्याची व्यवस्था केली पाहिजे. टेका नाका या भागात डेपो देण्याची व्यवस्था केली पाहिजे. यामुळे वाहतुक विभागाला येणारा भुर्दंड कमी होईल हा आमचा सुझाव आहे. त्यावर काही निर्णय घेण्यात आला काय?

व्यवस्थापक(श्री.जगताप):—मा.अध्यक्ष महोदय, मुळातच शहर बस करिता डेपो निर्माण करण्यासाठी 7 शासकीय जागेची निवड करण्यात आली. त्यातील टेका नाक्याची जागा ही खाजगी व्यक्तिची आहे. त्याच्यावर पूर्वी डेपो होता. त्यामुळे त्या जागेवर डेपो व्हावा असा हा कल आहे तो योग्य आहे. त्या जागेचे आपल्याला भाडे अदा करावे लागेल. 14 आरक्षित जागा आहेत

त्यापैकी 7 शासकीय जागा आहेत आणि त्या शासकीय जागेपैकी 3 जागेसाठी अडचण आहे. टेका नाक्याच्या बाबतीमध्ये दहा–पंधरा दिवसामध्ये वाहतुकीचा अभ्यास करून कि.मी. वाईज किती आर्थिक भुर्दंड कमी होतो याचा अभ्यास करून प्रापर असेसमेंट करून घेतो.

श्री.नितीन साठवणेः–मा.अध्यक्ष महोदय, जर कां डेपो भाडयाने घेवू शकत असेल तर हरकत नाही. आता दर कि.मी.प्रमाणे आपल्याला 45 रू. खर्च येत आहे. तो वाचून जाईल. त्या रूटवरून ज्या गाडया चालत आहे त्यावर येणारा हा भुर्दंड वाचून जाईल. माझ्या माहितीप्रमाणे पुष्कळ पैश्याची बचत होईल त्यामुळे असा निर्णय घेण्यास हरकत नाही.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, आपण टेका नाका हा 5 वा डेपो कार्यान्वित केल्यानंतर 4 डेपोमधील काही काही पार्टमधील बस वाहतुक काढून करावे लागेल. सध्या डेपो शिफ्ट केल्यानंतर कि.मी.प्रमाणे किती सेव्हिंग होईल, भाडे कितपत राहील याचा ताळमेळ काढावा लागेल.

श्री.प्रविण भिसीकरः–मा.अध्यक्ष महोदय, आपल्याला 45 रू. पर कि.मी.प्रमाणे लागत आहे. डेपो दिल्यामुळे वाहतुकीस ते सोयीस्कर होईल आणि आपले 45 रू.पर कि.मी.प्रमाणे सुध्दा जे लागत आहे ते वाचणार आहे.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, सध्या आपल्याकडे 360 गाडया चालत आहे. 4 डेपोमधून गाडयाची वाहतुक होते. 4 डेपोमधून गाडया वर्ग कशा करायच्या ही अडचण आहे. सर्वांना रूट देणे, बसचे शेडयुल्ड देणे ही कार्यवाही करावी लागेल. पुढच्या सभेमध्ये याबाबत माहिती देण्यात येईल.

सभापतीः– येणा–या पंधरा दिवसामध्ये यावर त्वरित निर्णय घेवून याबाबतची प्रत सर्व मा. सदस्यांना घरपोच देण्यात यावी. आणि ही जागा डेपो करिता घेण्यात यावी.

श्री.प्रविण भिसीकरः–मा.अध्यक्ष महोदय, प्रत्येक बसची क्लिनिंगकरिता 100 रू.प्रति बस दंड दिला आहे. त्या कंपनीचे वॉशिंग सेंटर आहेत काय? मागच्या बैठकीमध्ये म्हटले होते की सहा महिने व्हायचे आहे म्हणून भुर्दंड लावला नाही. आता सहा महिने लोटले आहे तर दुस–या दिवशीपासून भुर्दंड लावलेला आहे काय?

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, 10 डिसेंबर 2017 नंतर दंडात्मक कार्यवाही सुरू केली आहे. दंडाची कार्यवाही केल्याचे 4 डेमोमध्ये नमुद केले आहे. डिसेंबर पेड जानेवारीच्या बिलामध्ये ते करण्यात येईल.

श्री.नितीन साठवणेः–मा.अध्यक्ष महोदय, आतापर्यंत किती भुर्दंड लावला याचा अहवाल देण्यात यावा.

श्री.प्रविण भिसीकरः– कोणकोणत्या कंपनीकडे वॉशिंग सेंटर आहेत.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, 4 डेपोला वॉशिंग सेंटर आहेत. 9 नंबरच्या नाक्याला नाही. सर्व मिनी बसेस आहेत त्यांनी मॅन्युअल वॉशिंग सुरू केली आहे.

श्री.नितीन साठवणेः–मा.अध्यक्ष महोदय, हे बघण्याकरिता परिवहन विभागातर्फे कुठली यंत्रणा आहे.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, कंपनीकडे आपण ही जबाबदारी दिली आहे. प्रोग्राम मॅनेजर याची ही जबाबदारी आहे.

श्री.नितीन साठवणे:–मा.अध्यक्ष महोदय, कंपनीकडून अटीशर्तीचे पालन केले जात नाही.

श्री.प्रविण भिसीकर:– याचे वॉच कोण करीत असते.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, वॉशिंगच्या अनुषंगाने पटवर्धन आणि हिंगणा डेपोला सक्त पत्र दिले होते.

श्री.नितीन साठवणे:–मा.अध्यक्ष महोदय, बसेस मॅन्टेन्स्करिता आपण कोणाला ठेवले आहे. बस मागून धूर फेकला जातो हे बघितल्यावर गाडयांचे मेंटेन्स् होत नाही असे लक्षात येते. याच्यावरती निगराणी ठेवणारी कुठली यंत्रणा आहे.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, बस डेपोमधून निघतांना वाहन परिक्षकामार्फत परिक्षण करण्यात येते. पटवर्धन, खापरी नाका येथे असे लक्षात आले होते.

श्री.नितीन साठवणे:–मा.अध्यक्ष महोदय, त्यांच्यावर कार्यवाही केली नाही काय?

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, निश्चितपणे ज्या ज्या फॉल्टी गाडयामुळे जे रूट रद्द होतात त्याचे पेमेंट करीत नाही.

श्री.नितीन साठवणे:–मा.अध्यक्ष महोदय, जर यावर लक्ष देण्यात आले नाही तर आपल्या बसेस भंगार होवून जातील. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा भुर्दंड सुध्दा लावण्यात येत नाही.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, 10 डिसेंबर 2017 पासून भुर्दंडची कार्यवाही केली आहे.

श्री.नितीन साठवणे:– या दहा दिवसात किती भुर्दंड लागलेला आहे.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, सध्या मला सांगता येणार नाही.

श्री.प्रविण भिसीकर:–मा.अध्यक्ष महोदय, परिवहन विभागात डेप्युटेशनवर घेतलेले आहेत त्यांचा कुठले मार्गदर्शन विभागाला होत आहे. आणि त्यामुळे परिवहन विभागाला कुठला फायदा होत आहे ते सांगण्यात यावे.

सभापती:– माहिती दयावी.

व्यवस्थापक(श्री.जगताप):–मा.अध्यक्ष महोदय, पुर्वी 225 गाडया चालत होत्या आता 360 गाडया चालून राहिल्या. 52 नवीन मार्गावरून गाडया सुरू केल्या आहेत. दोन गोष्टी नमुद करण्यात येतात. मा.सदस्यांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. ट्रान्सपोर्ट ॲथोरिटी म्हणून महानगरपालिका कमी पडत आहे. ज्या डेपो करिता जागा द्यावयाच्या होत्या त्या आपण देवू शकलो नाही तोही एक भाग आहे. आरक्षित जागेची किंमत खुप जास्त आहे याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे त्या जागा आम्हांला मोफत देण्यात याव्यात तो विषय प्रलंबित आहे. याच्या व्यतिरिक्त महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे पेमेंट रेग्युलर होत नाही. अडीच महिन्यापर्यंत ऑपरेटरचे पेमेंट थकीत राहतात. त्यामुळे मागे डेपोमध्ये अडचण निर्माण झाली होती.

श्री.प्रविण भिसीकर:–मा.अध्यक्ष महोदय, जे अधिकारी डेप्युटेशनवर घेतले आहे त्यांच्यामुळे किती टक्के घाटा कमी होत आहे. गर्व्हमेंट पब्लीक ट्रान्सपोर्ट घाटयात राहतातच. आपण डेप्युटेशनवर त्यांना कां बरे घेत आहे की त्यांच्या अनुभवाचा फायदा आपल्या कामात झाला

पाहिजे. त्यांनी आतापर्यंत कोणते सुझाव दिले आहे. परिवहन विभागाने सुझाव मागितले नसेल तर आता त्यांचे कोणते सुझाव आहे ते मागविण्यात यावे. जर काही सुझाव असतील तर चर्चा करावी. चर्चेतुन काही तरी मार्ग निघेल.

व्यवस्थापक(श्री.जगताप):—मा.अध्यक्ष महोदय, आपला नेट लॉस वाढून राहिलेला आहे. सुरूवातीच्या काळामध्ये व्हीएनआयएल ऑपरेटर प्लॉन करू शकली नाही. मागच्या वर्षी व्हीएनआयएल ऑपरेटर होते त्यांनी सुध्दा लॉस दर्शविला नाही. दर महिन्यात कि.मी.वाढले तसे लॉस सुध्दा वाढत गेले. 11—12 मार्गावरून आता 48 मार्ग सुरू केले तसेच डेपो कार्यान्वित करण्यात वेळ लागत असल्यामुळे लॉस येत आहे. पार्किंगचा रेव्हेन्यु ऑन पेपर होता तो आता प्रगत होत आहे. दोन दिवसानंतर स्मार्ट सिटी रेव्हेन्यु होणार आहे त्याच्यामध्ये सुध्दा प्रस्ताव टाकणार आहे. मेट्रोपॉलीसिटी अर्बन ट्रान्सपोर्ट राहील परंतु ती महानगरपालिकेला झेपणार नाही त्याकरिता अशी एक ॲथारिटी असावा.

श्री.नितीन साठवणे:—मा.अध्यक्ष महोदय, एस.टी.महामंडळ घाटयात नाही.

श्री.प्रविण भिसीकर:— यावर काही उपाययोजना कराव्यात.

व्यवस्थापक(श्री.जगताप):—मा.अध्यक्ष महोदय, पुढच्या सभेमध्ये तोटा कमी करण्याच्या उपाययोजना सांगण्यात येतील.

श्री.प्रविण भिसीकर:—मा.सभापती महोदय, एक गोष्ट लक्षात आणून देतो. खाजगी बसेस एफ.एम. वाल्यांना दिली त्यांच्या 100 गाडयामध्ये गाणे चालू राहतात. ती प्रोसेस आम्हांला आणायला पाहिजे. आपणही एफ.एम कडून मार्केटींग करायचे, नागपूर शहर बसचे कोणकोणते रूट आहेत, कोणत्या रूटवरून गाडया चालतात. याची पब्लिसिटी केली तर विद्यार्थ्याकरिता आणि नागरिकांकरिता योग्य होईल. ज्याप्रमाणे मुंबई मेट्रोमध्ये एक स्ट्रीपवर माहिती येते त्याप्रमाणे आपल्या बसच्या आतमधील भागात स्ट्रीप लावता येईल. त्याचा ईओआय काढता येईल. त्याच्यामार्फत उत्पन्न येवू शकते काय? याचे सर्चिंग करण्यात यावे. बसच्या मागच्या बाजूस असलेल्या एलएडी लाईटवर काही करता येईल काय? अशा काही उपाययोजना असल्या तर उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने करता येईल आणि याचा महानगरपालिकेला फायदा सुध्दा होईल.

सभापती:— सर्व मा.सदस्यांनी आणि अधिका—यांनी ज्या काही उपाययोजना असतील त्या लेखी स्वरूपात दयावात त्या साकार करण्याचा आपण प्रयत्न करू.

<u>ठराव क्रमांक 34:—</u> आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>परिवहन समिती<br>महानगरपालिका,नागपूर